**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **राज्याच्या विकासाला महायुती सरकारच चालना देऊ शकेल, धुळे इथल्या प्रचार सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, तर राज्यात महायुती सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना १५ हजार रुपयांचा शेतकरी सन्मान निधी देण्याचे नाशिक इथल्या सभेत आश्वासन.**
- **विधानसभा निवडणुकीचा प्रचार तापला, सर्वपक्षीय नेत्यांच्या राज्यभर सभा; पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या अकोल्याच्या दौऱ्यावर.**
- **महाविकास आघाडी सरकारने बंद केलेल्या योजना पुन्हासुरु करण्याचं केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं सांगलीतल्या सभेत आश्वासन.**
- **भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात.**

प्रचार सभा

राज्यात निवडणुकीचा प्रचार तापला आहे. सर्व पक्षांच्या बड्या नेत्यांच्या सभा ठिकठिकाणी होत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी तर्फे आपापल्या कामांचा लेखाजोखा मतदारांसमोर मांडतानाच विरोधकांवर आरोप, टीका करण्यात येत आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज धुळ्यात जाहीर सभा घेतली. महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्याचं काम केवळ महायुतीचं सरकारच करु शकतं, असं त्यांनी सांगितलं. महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, आदिवासींचे हक्क इत्यादी क्षेत्रात युती सरकारने राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महाविकास आघाडीने अनेक विकासप्रकल्पांच्या मार्गात खोडा घातला असा आरोप त्यांनी केला. तसंच मविआमधे आपसात भांडणं असल्याबद्दल त्यांनी टीका केली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा आपल्या सरकारने मिळवून दिल्याची आठवण करुन देत त्यांनी डबल इंजिन सरकार निवडून देण्याचं आवाहन मतदारांना केलं. वाढवण इथं विमानतळ बांधण्याच्या मागणीचा विचार आचारसंहिता संपल्यानंतर करु असं आश्वासन त्यांनी दिलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही भाषण यावेळी झालं. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, रस्ते आणि पायाभूत सुविधा

विकास अशी आश्वासनं त्यांनी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातली ही त्यांची पहिलीच प्रचारसभा होती. त्यानंतर नाशिकमधे त्यांची झाली. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत पहिल्या अडीच वर्षात महाविकास आघाडीचे सरकार होते, मात्र, राज्यात उर्वरीत कालावधीत महायुतीची सत्ता आल्यानंतर विकास योजना राबवण्यात आल्या. लाडकी बहिण योजनेची तर देशभरात चर्चा आहे. काँग्रेस पक्षाला महाराष्ट्राची प्रगती सहन होत नसल्याने आघाडी समवेत ते सत्तेवर आल्यास या चांगल्या कल्याणकारी योजना बंद करतील अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली त्याच बरोबर राज्यात महायुतीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना सध्या १२ हजार रूपये किसान सन्मान निधी दिला जातो तो वाढवून **पंधरा** हजार केला जाईल अशी घोषणाही त्यांनी केली. दरम्यान, काँग्रेस संविधानाबाबत लोकांची दिशाभूल करत आसल्यची टीका त्यांनी केली...

***साथियों, कांग्रेस के साथियों को न बाबासाहब आंबेडकर के संविधान की परवा है, न कोर्ट की, और नहीं देश की भावना की, जब संविधान की रक्षा की बात आती है, ७५ साल तक जम्मू-कश्मीर में बाबासाहब आंबेडकर के संविधान को लागु नहीं होने दिया / ७५ साल तक देश में एक संविधान नहीं था / जम्मू-कश्मीर का संविधान अलग था, वो बाबासाहब आंबेडकर वाला नहीं था / भाजपा-एनडीए ने आर्टिकल ३७० को हटाया और एक देश एक संविधान लागु किया /***

अकोला पंतप्रधान सभा

दरम्यान, उद्या ९ नोव्हेंबर शनिवार रोजी वरिष्ठ भाजप नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा अकोल्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मैदानावर होऊ घातली असून सकाळी साडेदहा वाजता या सभेचे नियोजन करण्यात आले आहे. सभेची पूर्ण तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. पंतप्रधान अकोल्यात येत असल्याने पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.

प्रचार

राज्यात निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्व पक्षांच्या बड्या नेत्यांच्या सभा ठिकठिकाणी होत आहेत. येत्या काळात महाराष्ट्रात एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट आपल्या सरकारने ठेवले आहे, जेणेकरून महिलांना

अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आणता येईल असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते अमरावती येथे युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत आज बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज गोंदिया जिल्ह्यात महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांच्यासाठी सभा घेतली. लोकसभेच्यावेळी विरोधी पक्षांनी लोकांची दिशाभूल केल्याचे ते म्हणाले. आपल्याला पक्षांवर टीका टिपण्णी न करता विकास करायचा आहे असे ते म्हणाले, माझी लाडकी बहीण, माझा लाडका शेतकरी या योजना महायुती सरकारने आणल्या. परंतु काँग्रेसच्या सरकारने कर्नाटक, राजस्थान येथे अशा योजनांची आश्वासनं पूर्ण केली नाहीत, हे सर्वांना माहीत आहे, अशी टिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल' नागपूरमधे केली.

स्वीप

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन आजपासून सुरु झाल आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत. मुंबईत होणाऱ्या या सोहळ्यात भारत निवडणूक आयोग तसंच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी, चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांच्या उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे.

विशेष गाड्या

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वेनं आजपासून 164 विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यादृष्टीनं रेल्वेनं 476 गाड्यांचं नियोजन केलं आहे. रेल्वे विभागातर्फे आतापर्यंत चार हजार ५२१ रेल्वे गाड्या चालवण्यात आल्या असून 65 लाख प्रवाशांनी याचा लाभ घेतल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. या महिन्याच्या चार तारखेला एकाच दिवसात तीन कोटींपेक्षा जास्त प्रवाशांनी रेल्वे प्रवास केल्याचंही मंत्रालयानं सांगितलं.

अमित शाह सभा

भारताला सर्व क्षेत्रात सर्वोत्तम बनवणं हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं लक्ष्य असून हे एनडीए सरकारच करु शकतं असं केंद्रिय मंत्री अमित शहा यांनी सांगली जिल्ह्यात

शिराळा इथं प्रचारसभेत सांगितलं. यावेळी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं. महाविकास आघाडीनं बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु केल्या जातील, असं सांगून त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर टीका केली. मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १० लाख १५ हजार कोटी रुपये दिले असल्याचं शहा यांनी यावेळी सांगितलं.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सामंजस्य करार

भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था ट्रीपल- आईटी नागपूरने प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, माउंट अबू, राजस्थान सोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. ही भागीदारी डिजिटल वेलनेस, मूल्य-आधारित शिक्षण, ध्यान आणि वैयक्तिक विकास कार्यक्रमांद्वारे आईआईआईटी, नागपूरमधील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय,माउंट आबू, राजस्थान चे बाला किशोर- डिजिटल वेलनेस कोच, आणि (ट्रीपल- आईटीचे संचालक डॉ.प्रेमलाल पटेल यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

दिवाळी अंक प्रदर्शन

नागपूरच्या सीताबर्डी इथल्या राजाराम दीक्षित वाचनालयामध्ये दिवाळी अंकाचे प्रदर्शन कालपासून सुरू झाले असून या प्रदर्शनामध्ये विनोद पर्यटन, आरोग्य, ज्योतिष, साहित्य, महिला, त्याचप्रमाणे आध्यात्मिक अशा विषयांवर आधारित विविध दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध असून हे प्रदर्शन 15 नोव्हेंबर पर्यंत सकाळी 8:15 ते रात्री 8 पर्यंत चालू राहणार आहे

क्रिकेट

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज रात्री डर्बनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सामन्याला सुरूवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाला परदेशी भूमीवर उत्तम कामगिरी दाखवण्याची संधी आहे. या संघानं घरच्या मैदानावर बांग्लादेश विरूद्धची टी-20 मालिका ३-० नं जिंकली होती. सध्या भारतीय संघ टी-20 संघ क्रमवारीत अव्वल स्थानावर तर दक्षिण अफ्रिका सहाव्या स्थानावर आहे.

## गृहभेटी पहिले मतदान

वाशिम जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आज गृहमतदान होत आहे. निवडणूक अधिकारी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन बॅलेट पेपरद्वारे मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत. गृहमतदानासाठी रिसोड मतदारसंघात ५४६, वाशिम मतदारसंघात ४३२ तर कारंजा मतदारसंघात ४७९ मतदारांनी नोंद केली आहे.

## दक्षता जागरूकता

भ्रष्टाचार हा एक आजार असून तो मुळापासून उखडून टाकला पाहिजे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. आज नवी दिल्ली इथं केंद्रीय दक्षता आयोगाच्या दक्षता जागरूकता सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू बोलत होत्या. विश्वास हा समाजाचा पाया असून भ्रष्टाचारामुळे समाजातील विश्वास कमी होतो, असंही त्या यावेळी बोलताना म्हणाल्या. भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण योजनेसारखे उपक्रम शासनातर्फे राबवले जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

## छगन भुजबळ

ईडीच्या कारवाईतून सुटका करून घेण्यासाठी महायुती सरकारमध्ये सामील झाल्याच्या वृत्ताचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी खंडन केलं आहे. आपण ओबीसी असल्यामुळे आपल्यावर कारवाई झाली असं भुजबळ यांनी म्हटल्याचं वृत्त ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी लिहीलेल्या पुस्तकाचा हवाला देत एका दैनिकाने छापलं आहे. मात्र या दैनिकाबरोबर आपली काही मुलाखत झालेली नाही, आपण कोणतंही पुस्तक लिहीलेलं नाही, तसंच ईडीच्या कारवाईचा आणि आपण सरकारमधे सामील होण्याचा काहीही संबंध नाही असं स्पष्टीकरण भुजबळ यांनी आज नाशिकमधे पत्रकारपरिषदेत दिलं.

*****